



दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर | वर्ष ४ थे | अंक २६३ वा | सोमवार दि.१४ एप्रिल २०२५ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.





## महापुरुषांची जयंती कशासाठी साजरी करायची?.

**संपादकीय....**

विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांची जयंती ही बाबासाहेबांचे जीवन आणि कार्य याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी करायची असते.बाबासाहेबांच्या विचारधारेचे समर्थक वाढवण्यासाठी बाबासाहेबांची जयंती करायची असते.बाबासाहेबांनी या देशांमधली वर्ण व जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला या जातीव्यवस्थेचे जे तोटे आहेत, ज्या नुकसान करणाऱ्या गोष्टी आहेत त्या इतरांना सांगण्यासाठी बाबासाहेबांची जयंती करायची असते.जातिव्यवस्थेने या देशातल्या एससी,एसटी,ओबीसी आणि महिलांचा जो छळ केला आहे, करत आहेत यापासून या सर्वांना सावध करण्यासाठी बाबासाहेबांची जयंती करायची असते.

बाबासाहेबांनी जो त्याग केला,संघर्ष केला आणि त्यागातून,संघर्षातून जे संविधान या देशाला दिले त्या संविधानातील प्रत्येक कलमांची माहिती सांगण्यासाठी बाबासाहेबांची जयंती करायची असते.स्वातंत्र्य, समता,बंधुता आणि न्याय यावर आधारित समाजव्यवस्था आणि देशाची पुनर्बांधणी करण्यासाठी,या विचारधारेचे समर्थक तयार करण्यासाठी बाबासाहेबांची जयंती करायची असते.आणि हे सर्व काम त्याच लोकांनी करायचे असते जे या विचारधारेचे खंबीर समर्थक असतात.धूमधडाक्यात जयंती साजरी केली म्हणून तुम्ही संघटना मोठी झाली असे गेल्या १३४ वर्षात झाले नाही,संघटनेची ताकद ही केवळ संभासदांच्या संख्येवर अवलंबून नसून संभासदांच्या प्रामाणिकपणावर संघटनेशी एकनिष्ठेवर आणि शिस्तपालनवर अवलंबून असते.

फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार या देशांमध्ये ब्राह्मण, कॉम्युनिटी,मारवाडी करतील का?. त्यांची जबाबदारी आहे का या विचाराचा प्रचार आणि प्रसार करण्याची?.बाबासाहेबांच्या जयंतीच्या संदर्भाने ज्या काही चुकीच्या बाबींचे पांयडे पडलेले आहेत ते नष्ट करणे हे सुद्धा बाबासाहेबांच्या जयंतीचा एक उद्देश असला पाहिजे.लोकशाही शासन व्यवस्थेला व्यक्तिपूजा ही घातक असते हे बाबासाहेबांनी वारंवार सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.आज या देशामध्ये लोकशाही पेक्षा मोदी लोकांना जवळचा वाटतो,हा लोकशाहीला व्यक्ती पूजेचा सर्वात मोठा धोका असल्याचे उदाहरण आहे.बाबासाहेबांच्या संदर्भात बोलायचे झाल्यास जयंतीच्या माध्यमातून आम्ही,लोकांना बाबासाहेबांच्या जीवन आणि कार्यापासून व विचारापासून दूर नेऊन व्यक्ती पूजेमध्ये गुंतवत असल्याचे प्रकार जयंतीच्या निमित्ताने घडत आहेत; जे आंबेडकरवादी चळवळीसाठी आणि त्याच्या भवितव्यासाठी धोकादायक आहेत. ३६५ दिवसांपैकी फक्त एक दिवस आणि तोही बाबासाहेबांच्या विचारासाठी नसेल, फक्त बँड लावून नाचण्यासाठी असेल तर आंबेडकरवादी चळवळीला भविष्य नसल्याचे सांगण्यासाठी कोण्या ज्योतिषाची गरज पडणार नाही.

आज या देशातील आंबेडकरवादी विचारधारा आणि भारतीय संविधान प्रचंड धोक्यामध्ये अडकलेले आहे याला वाचवण्याची जबाबदारी ही आंबेडकरवादी चळवळीच्या फ्रंट लाईन लीडर आणि विचारधारेचे फायदे घेणाऱ्या समाजाची आहे. सुशिक्षित आणि समजदार लोकांनी समाजाच्या कलाप्रमाणे वागायचं नसते.अशा भोळ्या भावड्या समाजाला बाबासाहेबांच्या विचाराकडे घेऊन जाण्याची जबाबदारी बुद्धिजीवी लोकांची असते ती भूमिका त्यांनी इमानदारी ने पार पडली पाहिजे.मनुवादी लोक बाबासाहेबांच्या विचारधारेपासून देशाला आणि समाजाला दूर नेत आहेत मग त्यांच्यात आणि आपल्यात काय फरक राहिला?.आर एस एस वाल्यांनी प्रबोधन शिबिराच्या माध्यमातून या देशांमध्ये आरक्षणाच्या विरोधात वातावरण तयार करून ठेवलं आहे आज या लोकांना आरक्षणापेक्षा धर्म मोठा वाटतो जो धर्म यांना काहीही देत नाही.आर एस एस ची प्रबोधन शिबिरं चालू आहेत.आम्ही मात्र प्रबोधन शिबिर घेण्या पासून शेकडो मैल दूर आहोत.आम्ही फक्त डॉल्बी,गाणे,गायक,बँड बाजा,जेवण आणि जयंती मधून इतर लोकांना शिव्या देणे याच्यामध्ये आहोत.

आंबेडकरवादी चळवळ उभी राहणार नाही,कारण गेल्या ७० वर्षांमध्ये आम्ही जयंती अशाच पद्धतीने केली,त्याचा कोणालाही फायदा झाला नाही.फक्त आम्ही जयंती केली एवढे एक समाधान मनात घेऊन आम्ही वर्षभर फिरत असतो,परंतु आमच्या आजूबाजूला असणाऱ्या आरक्षण धारक लोकांना आम्ही जोडण्यामध्ये अयशस्वी झालेलो आहोत हा आंबेडकरी चळवळीचा सर्वात मोठा पराभव आहे हे आमच्या अजूनही लक्षात येत नाही. लोकशाही जनाधार मागते,संविधान सत्ता मागते,व सत्ता बहुमताची असते.जनाधार असल्याशिवाय बहुमत नसते,आणि बहुमत नसते म्हणून सत्ता नसते, सत्ता नसते म्हणून कायदे करण्याचे अधिकार आपल्या हातात नसतात आणि म्हणून भारताच्या संसदेमध्ये खाजगीकरणाचे कायदे होतात.देशाच्या मालकीचे नफ्यात चालणारे उद्योग विकणारे कायदे होतात,धर्मांतर बंदी विधेयकं येतात,आरक्षण नष्ट करण्याचे कायदे होतात,ट्रॉसिटी कायद्याला दुबळे करण्यात येते. सगळे धोके बाबासाहेबांनी २६ नोव्हेंबर १९४९ च्या भाषणामध्ये सांगितलेले असताना सुद्धा आम्ही याकडे दुर्लक्ष केले.त्याचे परिणाम आम्ही आज भोगत आहोत.यामधून सावरण्यासाठी लोकसभा,विधानसभा निवडणुका ह्या सुवर्ण संध्या असतात. निवडणुकीमध्ये आम्ही जर पराभूत झालो तर बाबासाहेबांनी कमावलेलं सगळं आम्हाला गमवावे लागेल हे आता स्पष्ट झाले आहे.लोकशाहीच्या निवडून मार्गाने साम,दाम,दंड,भेद नीती वापरुन निवडणुक जिंकली पाहिजे.आणि जिंकल्या नंतर शासन प्रशासनावर कब्जा करता आला पाहिजे.आज मोदी दिसतात पण प्रशासनावर आर एस एस प्रणित भारतीय मजदूर संघाची किती मोठी पकड आहे हे आपण समजून घेत नाही.

बाबासाहेबांनी सांगितले होते शासन कर्ती जमात बना.म्हणजे काय हे आज ही आम्हाला समजले नाही. देशात असंघटित कष्टकरी कामगारांची संख्या ९३ टक्के आहे त्यात सर्वात जास्त मागासवर्गीय समाजाचे कामगार आहेत. त्यातील ३० टक्के कामगारांना आम्ही संघटित केले. तर सत्ता परिवर्तन करू शकतो. आणि सत्ता धारी नाही झालो तरी विरोधी पक्ष म्हणून कायम सत्ताधाऱ्यावर शासन,प्रशासनावर कायम दबाव निर्माण करू शकतो.इतिहास सांगतो जगात जी काही क्रांती झाली ती कामगारांनी केली आहे.म्हणून यापुढे आम्ही समदुखी आणि आरक्षण धारक जातीच्या असंघटित कष्टकरी कामगारांना नागरिकांना मतदारांना म्हणून जोडण्याचे काम करावे लागेल.तेच होत नाही,निवडणूक आली आणि जयंती आली की बाबासाहेबांच्या क्रांतिकारी विचारांची आठवण होते. बाकी दिवस आम्ही कसे जगतो,कोणाचे काम करून जगतो,कोणत्या विचारधारेच्या ट्रेड युनियन,संघटनेचे सभासद बनून वार्षिक वर्गणी देऊन त्यांना आर्थिक दुष्टया मजबूत बनवतो याचा विचार करत नाही.म्हणूनच जातिव्यवस्थेने या देशातल्या एससी,एसटी,ओबीसी आणि महिलांचा जो छळ केला आहे,करत आहेत यापासून या सर्वांना सावध करण्यासाठी बाबासाहेबांची जयंती करायची असते.विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करतांना आपण त्यांचा कोणता आदर्श घेतला आणि त्यांचे काय आचरण करतो,यांचे आत्मचिंतन अपेक्षित आहे.पण ते कोणी करावे?. आजची पिढी जेव्हा संघर्ष करते तेव्हा उद्याची पिढी सन्मानाने जागते. आणि आजची पिढी जेव्हा लाचार होते तेव्हा उद्याची पिढी गुलाम बनते. यावरूनच आपला प्रवास कोणत्या दिशेने सुरू आहे हे चित्र स्पष्ट होते.












# विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जयंती म्हणजे ज्ञानीवंताचा जागतिक सोहळा

कधी कुणी स्वप्नातही विचार केला नसेल की,१४ एप्रिल १८९१ ला एका सामान्य कुटूंबात एखादा व्यक्ती जन्माला येऊन पिढ्यान् पिढ्या शोषीत पिढीत तथा दुर्लक्षीत समुहाचा उध्दार करेल. कारण 'काळ' च एवढा क्रुर होता की,अशा परिस्थितीत कुणीतरी या काळावर स्वार होऊन या काळाची चक्र उलटे फिरविल अशी सुत्राम शक्यता वाटत नव्हती,अधून मधून काही समाज सुधारकांनी ही चक्रे उलटे फिरविण्याचे खुप प्रयत्न केले,परंतू काही अंशीच या प्रयत्नांना यश मिळू शकले असे म्हटले तर वावगे ठरू नये,असे असले तरी त्या प्रयत्नांनीही ब-याच अंशी आशेचे किरण सोशीत पिढीत तथा दुर्लक्षीत समुहापुढे दिसत होते.याच प्रयत्नांची -ही ओढणारे त्या त्या काळात समाज सुधारक जन्माला येत असत तथा तयार होत असत.

परंतू अज्ञानी समुहाची संख्या जास्त असल्यामुळे साहजिकच काहीतरी दैवी कोप आपल्यावर आहे आणि 'ठेविले अनंती तैसेची रहावे,चित्ती असू द्यावे समाधान' या उक्तीप्रमाणे आपल्याला याच परिस्थितीत आयुष्यभर जगायचे आहे,आपल्या नशीबी हेच जगणे आहे,असे मानून नशीबावर विश्वास ठेवणारा हा मानसिक गुलाम झालेला समुह इतक्या सहजासहजी परिवर्तनाकडे वळणे तथा वळविणे कठीणच होते.असे असले तरी काळाची दिशा चुकीची जात असेल तर त्याचा निसर्ग योग्य समतोल राखत असतो.

असाच पिढ्यान् पिढ्या शोषीत पिडीत तथा दुर्लक्षीत समुहाचा उध्दार करण्याच्या दृष्टीने मध्यप्रदेश मधील महू अर्थात लष्कर छावणीत रामजी संकपाळ व भिमाई यांच्या घरात बाळ भिवाचा जन्म झाला.

हळूहळू भिवा मोठा होत होता,तसा एक जात्यांध वृत्तीचा उचनिचतेचा महा भयानक अनुभव येऊ लागला,अशा अनूभवातूनच लहानग्या भिवाच्या मनावर सखोल परिणाम झाला,आम्ही माणसं असूनही आम्हाला माणसांसारखं का जगू दिलं जात नाही ? या एक ना अनेक अनुभवातून भिवाच्या काळजात खोलवर जखमा होऊ लागल्या,या खोलवर होत असलेल्या जखमांच्या वेदनेतून व त्या वेदनेच्या जाणिवेतून भिवांच्या विचारांत बदल होऊ लागले, आणि या विचारांच्या मन सखोल चिंतनात जाऊ लागलं आणि इथूनच क्रांतीला सुरूवात झाली. आणि जसा जसा भिवा मोठा होत गेला तसा तसा क्रांतीचा वणवा भडकत गेला.परिणामी या क्रांतीच्या वणव्यात विषमतावादी विचारांची राख होऊ लागली,पुढे भिवा चा भिमराव झाले अन् बघता बघता भिमरावाचे बाबासाहेब झाले.आणि याच बाबासाहेबांनी जगात कुणीच व कधीच केली नाही एवढी महान क्रांती करून दाखवली अर्थात पिढ्यान् पिढ्या शोषीत पिडीत दुर्लक्षीत असलेल्या समुहाला माणुसपणाचे हक्क बहाल करून दिले अर्थात गुलामांना गुलामीची जाणिव करून दिली,आणि बंड करून उठण्यास भाग पाडले.आम्हीही माणसं आहोत,आम्हालाही माणुस म्हणून जगण्याचा अधिकार आहे यांची जाणिव करून दिली,त्यामुळे प्रस्थापीत व्यवस्थेला धक्का देण्याचं काम या महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिला.याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे रायगड जिल्ह्यातील महाडच्या भुमीत घडलेल्या दोन क्रांत्या,

एक म्हणजे चवदार तळ्याचा सत्याग्रह करून पाणी ही निसर्गाची देण असून या पाण्यावर आमचाही अधिकार आहे व दुसरी क्रांती म्हणजे रायगडाच्याच पायथ्याशी मनुस्मृतीला जाळून जातीच्या उतरंडीला सुरूंग लावला.

आणि गुलामांच्या बेड्या तटातटा तुटल्या.मानसिक गुलामीत असलेला गुलाम मुक्त झाला.समतेचा रथ पुढे पुढे सरकू लागला, एवढं महा भयानक कठीण काम बाबासाहेबांनी मोठ्या हिमतीनं करू दाखवलं,एवढेच नव्हे तर जात व्यवस्था निर्मुलनासाठी लढा उभा केला,जनसामान्यांमध्ये जागृती निर्माण करून समता व न्यायासाठी आंतर जातीय विवाहाला प्रोहत्साहीत केलं,ज्यांच्या डोक्यात जात अन् डोक्यावर जात नावाचं ओझं आहे ते कुठेतरी उतरवलं पाहीजे,कारण एखाद्या विशिष्ट जातीत जन्माला येणं यात आपलं काहीच कर्तृत्व नसतं,तर ती मानव निर्मित असतं मग अशावेळी माणसांना जात नावाचं लेबल लावून एकमेकांपासून वेगळं करणं,तोडणं यात कसलं आलंय महानपण अन् शहाणपण,म्हणून हा जातीचा गर्व तथा अहंकार कुठेतरी संपवला पाहीजे यासाठीचं बाबासाहेबांचं महान कार्य आपल्याला बघायला मिळतं.अर्थातच सामाजिक बदल यातून घडविण्याचा बाबासाहेबांचा प्रयत्न दिसतोय,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'जातिव्यवस्थेचे निर्मूलन' (-पपळहळश्रींळेप`ष उरींश) या पुस्तकातून जातिव्यवस्थेच्या उच्चाटनासाठी उपाय सुचवलेले दिसतात.

तसेच १९४८ ला आणखी एक गोष्ट बाबासाहेब करतात ती म्हणजे 'हिंदू कोडबील' या बीलाची मांडणी करतात.काय आहे हे हिंदू कोडबील,हे बील म्हणजे बाबासाहेबांनी काही स्वार्थासाठी मांडलेलं बील होतं का ? तर नक्कीच नाही.किंवा एखाद्या विशिष्ट समुहासाठी काही पदरी पाडून घेण्याचा मानस होता का ? तर याचेही उत्तर नाही असेच म्हणता येईल,तर मग काय होतं हे बील,ते आपण समजून घेण्याचा प्रयत्न करू या, हिंदू कोडबील म्हणजे दुसरे तिसरे काही नसून 'समान नागरी कायदा' (उळींळश्र उेवश) लागू करणे हा बाबासाहेबांचा उद्देश होता.

हिंदू कोड बिलाची प्रमुख वैशिष्ट्ये:

विवाह आणि घटस्फोट:
स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार आणि बहुपत्नीत्वावर बंदी घालणे.

संपत्तीत समान हक्क:
महिला आणि मुला-मुलींना समान हक्काने मालमत्तेत हिस्सा मिळवणे.

दत्तक घेणे:
दत्तक घेण्याच्या नियमांमधील सुधारणा.

वंश आणि जात:
जातींवर आधारित निर्बंध दूर करणे.

समान नागरी कायदा:
हिंदू कायद्याला समान नागरी कायद्याच्या दिशेने नेणे.

स्त्री सबलीकरण:
या बिलाने महिलांना अधिक अधिकार दिले,ज्यामुळे अनेक पारंपरिक विचारसरणी असलेल्या व्यक्तींचा विरोध झाला.

राजकीय वाद:
या बिलावरून राजकीय वाद निर्माण झाले,बीलाला विरोध झाला,आणि तिथेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कायदा मंत्रीपदाला लाथ मारून राजीनामा दिला.

आज जी महीला कुठल्याही समुहातील तथा समाजातील असेल अन् आत्म सन्मानाने जगत आहे तर ती फक्त बाबासाहेबांनी मांडलेल्या हिंदू कोडबीलामुळे व आजच्या भारतीय संविधामुळे. तर यावरून हेच लक्षात घेतले पाहीजे की,विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी कधीही व्यक्तीगत स्वार्थासाठी काम केले नाही तर ज्यांनी पिढ्यान् पिढ्या जात व्यवस्थेच्या ओझ्याखाली येथील विशिष्ट समुहाचे शोषण केले,असे असतांनाही बाबासाहेबांनी मनात कुठलाच द्वेष न ठेवता,सगळ्यांना समान न्याय मिळाला पाहीजे,यासाठीच शोषीत पिडीत तथा दुर्लक्षीतांबरोबरच इतर समाजासाठीही मानवीय दृष्टीकोनातून त्यांनी काम केलेले बघायला मिळते.यात

✻ कामगारांसाठी १२ तासावरून ८ तासांवर कामाचे तास करणे,✻ महीलांना भर पगारी प्रसुती रजा मंजूर करणे,

✻ दिवाळी बोनस

✻ अशा अनेक गोष्टी या महामानवाने देशाला दिल्या.

✻ भारताचे भारतीय संविधान हे ही याच महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांची देण आहे.आणि म्हणूनच जगाच्या इतिहासात हा एक कधीही न पुसला जाणारा क्षण आहे,बुध्दीचातुर्याच्या कौशल्याने व प्रचंड ज्ञानाच्या कसोटीवर इथल्या प्रस्थापीत व्यवस्थेला उलथवून टाकणा-या या महामानवाची जयंती ही जगभर साजरी होत असते.


आणि म्हणूनच
विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जयंती म्हणजे ज्ञानीवंताचा जागतिक सोहळा बनला आहे.

जगाच्या नकाशावर आपली ज्ञानाचे प्रतीक अशी ओळखच या महामानवाने दिली आहे,नव्हेतर एकप्रकारे आपल्या ज्ञानाचा ठसाच त्यांनी उमटवला आहे.

१३४ व्या जयती दिनानिमित्त महामानव विश्वरत्न प.पु बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कोटी कोटी वंदन..

---------------------

विकास रामराव साळवे
९८२२५५९९२४.

















14 APRIL
दैनिक महावृत्त
वर्धापन दिन
निमित्त
हार्दिक शुभेच्छा
भारतीय संविधान निर्माते
विश्वरत्न महामानव
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
यांच्या १३४ व्या जयंती निमित्त
कोटी कोटी प्रणाम..!
* शुभेच्छुक *
के.जी.एन.कंस्ट्रक्शन,केज
बिल्डींगची सर्व कामे मटेरियलसहित योग्य दरात करून मिळतील.
प्रो.प्रा.शकीलभाई सय्यद


दैनिक महावृत्त
वर्धापन दिन
निमित्त हार्दिक शुभेच्छा...!
शुभेच्छुक
श्री.पिंटू (बप्पा) ठोंबरे
(पंचायत समिती सदस्य ,वीडा गण)


दैनिक महावृत्त
वर्धापन दिन
निमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक : ग्रामपंचायत कार्यालय,केकत सारणी ता.केज जि.बीड


दैनिक महावृत्त वर्धापन दिन
निमित्त हार्दिक शुभेच्छा...!
सरपंच
उपसरपंच
ग्रामपंचायत अधिकारी
शुभेच्छुक : सौ.जनाबाई नरहरी काकडे
ग्रामपंचायत कार्यालय,साबला ता.केज जि.बीड


दैनिक महावृत्त
वर्धापन दिन
निमीत्त हार्दिक
शुभेच्छा
शुभेच्छुक : सौ.उषाताई रमाकांत मुंडे (जिल्हाध्यक्ष भाजपा महिला मोर्चा,बीड जिल्हा)


डॉ.बाबासाहेब आंबेडकर
यांच्या जयंतीनिमित्त
हार्दिक
शुभेच्छा
मा. सुभाषबाबु नायक राठोड
युवा नेते राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ओबिसी आघाडीचे
नांदेड जिल्हा सचिव किनवट ता किनवट जिल्हा नांदेड.


दैनिक महावृत्त
वर्धापन दिन
निमीत्त हार्दिक
शुभेच्छा
-----: शुभेच्छुक :-----
राहुल (भैय्या) गदळे
सचिव : शिवकृपा शिक्षण प्रसारक मंडळ,
दहिफळ वडमाऊली,ता.केज
सखाहरी (तात्या) गदळे


दैनिक महावृत्त
वर्धापन दिन
निमित्त हार्दिक
शुभेच्छा...!
शुभेच्छुक : माऊली विद्यापीठ,केज जि.बीड



















PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE